# शिक्षणातील ‘वर्णाश्रम’ दूर व्हावा

## ‘लोकसत्ता’ आयोजित शिक्षणविषयक चर्चासत्रात मान्यवरांचे मनोगत

प्रतिनिधी, मुंबई

**ज्ञानाधारित अर्थकारणाची** जगभर सुरुवात झाली आहे. या व्यवस्थेत टिकायचे असेल, तर शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असून त्यासाठी छोटी विद्यापीठे उभारावी लागतील, शहरात अडकून पडलेल्या विद्यापीठांची ग्रामीण भागात स्थापना करावी लागेल, असा विचार मांडत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार आणि ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राला नवी दिशा दिली. शिक्षण, संशोधन, कौशल्य, तंत्रज्ञान यांना वेगवेगळ्या कप्प्यात बंद करणारी ‘वर्णाश्रम’ व्यवस्था दूर करून शिक्षणाचा सर्वांगीण विचार यापुढे करावा लागेल, असाही सूर यावेळी व्यक्त झाला.



चर्चासत्रात बीजभाषण करताना ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार.




### ‘सरस्वती स्वतंत्र कधी होणार ?’

१९४७ मध्ये देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळून भारतामाता स्वतंत्र झाली, १९९१ मध्ये आर्थिक क्षेत्रात जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरण झाले व लक्ष्मीमाता स्वतंत्र झाली. आता शिक्षण क्षेत्रात जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरण होऊन सरस्वती माता स्वतंत्र करण्याची वेळ आली आहे, य डॉ. मुजुमदार यांनी बीजभाषणात व्यक्त केलेल्या मताला उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटातून जोरदार सहमती व्यक्त झाली...

‘लोकसत्ता’ व ‘सारस्वत बँके’तर्फे आयोजित ‘शिक्षणात महाराष्ट्र कुठे?’ या दोन दिवसांच्या चर्चासत्राच्या बीजभाषणात पुणे येथील प्रसिद्ध सिम्बायोसिस शैक्षणिक संकुलाचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी सध्याच्या पठडीबाज शिक्षण व्यवस्थेवर, सरकारी निर्बंधांवर कठोर प्रहार केले. विस्तार करणे-गुणवत्ता वाढ-सर्वसमावेशकता राखणे, उच्च शिक्षणातील गळती आणि परमिटराज ही शिक्षण क्षेत्रापुढील तीन प्रमुख आव्हाने आहेत. ती पेलण्यासाठी नावीन्यपूर्ण मार्ग काढून शिक्षण पद्धती ढवळून काढावी लागेल, असे आग्रही प्रतिपादन मुजुमदार यांनी केले. यापुढच्या काळात छोटी विद्यापीठे स्थापन व्हायला हवीत, कौशल्य विकास महत्त्वाचा ठरणार असल्याने कौशल्य विकसित करणारे शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन झाली पाहिजेत, असे ते म्हणाले. सध्या शैक्षणिक संस्थांवर १७ विविध नियंत्रक संस्थांचे निर्बंध असून त्यातून केवळ भ्रष्टाचार पोसला जात असल्याचा आसूड ओढत या बेड्यांमधून शिक्षण क्षेत्राला स्वतंत्र करायला हवे, अशी स्पष्टोक्तीही त्यांनी केली.

तर डॉ. काकोडकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरातील विद्यापीठात येण्याऐवजी विद्यापीठांची संकुले ग्रामीण भागात उभारली जावीत, अशी मांडणी केली. ग्रामीण भागात विद्यापीठ स्थपन झाल्यानंतर तेथील समस्यांवर मात करणारे संशोधन-त्यात होईल व त्यातून नवीन तंत्रज्ञानाची प्रगती होईल. परिसरातील लोकांना उपजीविकेचे साधन मिळेल आणि यातूनच शाश्वत विकासाची प्रक्रिया सुरू होईल, असा विचार काकोडकर .यांनी मांडला. संशोधन-तंत्रज्ञान आणि त्याचा औद्योगिक उपयोग हे आपल्याकडे कप्पाबंद झाले आहेत. एकप्रकारची ‘वर्णाश्रम’ व्यवस्था शिक्षणात निर्माण झाली असून ती हानीकारक आहे. तसे न होता त्यांची सरमिसळ व्हावी आणि

पान २ पाहा



# शिक्षणातील ‘वर्णाश्रम’ दूर व्हावा

(पान १ वरून )

शिक्षण सर्वांगीण व्हावे, असे काकोडकर म्हणाले.

चर्चासत्राच्या उद्घाटनपर भाषणात सारस्वत बँकेचे अध्यक्ष एकनाथ ठाकूर यांनी शिक्षण हे राष्ट्रीय चारित्र्य घडविणारे साधन ठरावे अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षणाने सुशिक्षित झालेले लोक सुरक्षित झाले, पण ते संकुचितही झाले, अशी खंत व्यक्त करून, परिवर्तन घडविण्याचे धाडस दाखविणारे सक्षम नागरिक निर्माण व्हावेत अशी शिक्षणव्यवस्था आखण्याची गरजही ठाकूर यांनी व्यक्त केली.

‘मराठीची गळचेपी- किती खरी किती खोटी?’, ‘शिक्षणमंडळ काय करतंय?’, ‘आजची शांतिनिकेतनं कुठे आहेत?’ या विषयांवर शुक्रवारी तीन सत्रांमध्ये विविध नामवंतांनी आपले विचार मांडले. शनिवारी ‘शिक्षकांचे शिक्षण’, ‘उच्चशिक्षण - कालसुसंगत की कालबाह्य?’ या विषयांवर चर्चासत्र होईल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या भाषणाने या दोन दिवसीय चर्चासत्राचा समारोप होणार आहे.

‘लोकसत्ता’च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी सूत्रसंचालन केलेल्या या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संपादक गिरीश कुबेर ‘बदलता महाराष्ट्र’ हा उपक्रम आणि शिक्षणविषयक चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. ‘सारस्वत बँके’चे अध्यक्ष एकनाथ ठाकूर यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले. तर समारोप ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ आणि राज्य सरकारच्या उच्च शिक्षण विषयक समितीचे प्रमुख डॉ. अनिल काकोडकर यांच्या भाषणाने झाला.